

# ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यासाठी 'अभिनव प्रयोग'

'महिला किसान अधिकार मंच' (मकाम) संचलित 'महिला ऊसतोड कामगार संघटना', बीड आणि हिंगोली जिल्ह्यातील ८० गावांमध्ये गेल्या चार वर्षांपासून काम करत आहे. संघटना, ऊसतोड कामगारांना कामगार म्हणून मान्यता, स्थलांतराच्या काळात सोयी-सुविधा, रेशन, गावात रोजगार आणि आरोग्य यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करत आहे. विशेषत: ऊसतोड कामगारांसाठी स्थलांतरित गावात आणि मूळ गावात आरोग्य सेवा मिळवण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. यश-अपयश अनुभवत 'महिला ऊसतोड कामगार संघटना', सोपेकॉम या संस्थेच्या सहाय्याने अनेक प्रयोगांची चाचपणी करत काम करत आहे. शासनाच्या माध्यमातून हे प्रयोग सर्वत्र लागू होतील अशी संघटनेला आशा आहे.

## 'जन आरोग्य समिती'त महिला ऊसतोड कामगारांचे प्रतिनिधित्व

'महिला ऊसतोड कामगार संघटना' गावपातळीवर ऊसतोड महिलांच्या आरोग्यविषयक किंवा आरोग्याच्या प्रश्नांवर काम करत आहे. या महिलांचे आरोग्याचे प्रश्न मांडण्यासाठी हक्काचे ठिकाण म्हणजे 'आरोग्य वर्धिनी केंद्रातील 'जन आरोग्य समिती'. या समितीत महिला ऊसतोड कामगारांचा समावेश व्हावा, यासाठी संघटनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी विविध पातळ्यांवर प्रयत्न केले. संघटनेच्या गाव पातळीवरील बैठकांमध्ये या मागणीवर एकमत झाले. गावांमध्ये महिला ग्राम सभा आयोजित करण्यात आल्या. ठराव मिळवण्यामध्ये अनेक अडचणी आल्या तरी कार्यकर्त्यांनी त्यासाठीचे ठराव ग्रामसभेत करून घेतले. सह्यांची मोहीम राबवून जिल्हाधिकारी व मुख्यमंत्र्यांना निवेदने सादर करण्यात आली. यासोबतच जिल्हा ते गाव पातळीपर्यंत, आरोग्य यंत्रणेला 'जन आरोग्य समिती'त महिला ऊसतोड कामगारांचे प्रतिनिधित्व का आवश्यक आहे, हे स्पष्टपणे समजावून सांगण्यात आले. सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे स्थानिक प्रशासनाने ही मागणी मान्य केली.

बीडमध्ये २५ हून अधिक तर हिंगोलीत १५ हून अधिक महिला ऊसतोड कामगार 'जन आरोग्य समिती'च्या सदस्य झाल्या. महिला ऊसतोड कामगार सदस्यांनी 'जन आरोग्य समिती' मध्ये सक्रिय व्हावे म्हणून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. समितीच्या मीटिंगमध्ये कोणते मुद्दे मांडावे, आपली जबाबदारी काय, आणि आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी कशी केली जाते, याबद्दल त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महिलांना ऊसतोडीमुळे होणाऱ्या आरोग्य समस्या, समितीची रचना, आणि स्थानिक आरोग्य यंत्रणेचे कार्य समजावून सांगण्यात आले. या महिला प्रतिनिधी आता 'जन आरोग्य समिती'च्या मीटिंगमध्ये ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्य समस्या मांडू लागल्या आहेत. त्यांचे आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी आरोग्य यंत्रणे सोबत समन्वय साधत आहेत.

## ऊसतोड महिलांसाठी आरोग्य शिबिरे

'आरोग्यवर्धिनी केंद्र'च्या 'जन आरोग्य समिती'त ऊसतोड कामगार महिला सहभागी झाल्यामुळे महिला ऊसतोड




कामगारांची आरोग्य तपासणी, आरोग्य शिबिरे आयोजित करण्यास आरोग्य यंत्रणेला मदत होऊ लागली. खास करून ही शिबिरे ऊसतोडीला जाण्यापूर्वी व आल्या नंतर आयोजित करण्यात आली. या शिबिरात गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची तपासणी, योनीमार्गाचे संक्रमण तपासणी, गरोदर स्त्रियांची आरोग्य तपासणी, एच.बी. तपासणी, रक्तदाब (बी.पी.), मधुमेहची तपासणी करून ज्यांना उपचाराची गरज आहे अशांवर उपचार करण्यात आले. मागील दोन वर्षात बीड आणि हिंगोली जिल्ह्यातील एकूण 30 गावात शिबिरे आयोजित करण्यात आली असून, एकूण 1000 महिला या शिबिरांत सहभागी झाल्या व त्यांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

या महिला प्रतिनिधी गावातील महिलांना आरोग्य शिक्षण देण्याचे प्रयत्न करतात. स्थानिक आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आणि आरोग्य केंद्रांना भेट देऊन गरोदर महिला व बालकांचे लसीकरण करून घेतात. गरोदर आणि स्तनदा मातांना आरोग्य सेवा व योजना मिळवण्यासाठी पाठपुरावा करतात. गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, किशोरवयीन मुली, ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांची यादी तयार करून त्या आरोग्य विभागाला सादर करतात. त्यांच्या आरोग्य तपासण्या व्हाव्यात म्हणून प्रयत्न करतात.



## जन आरोग्य समिती सदस्यांचे अनुभव

"आम्ही नियमितपणे समितीच्या बैठकीला हजर राहून आरोग्य वर्धिनी केंद्राच्या आसपास अस्वच्छता आणि कचरापेट्या ठेवण्याचा मुद्दा मांडला, ज्यामुळे ग्रामपंचायतीने कचरापेट्या उपलब्ध करून दिल्या."

- **कल्पना थोरात, पिंपळवाडी,** जन आरोग्य समिती सदस्य, तालुका व जिल्हा- बीड.

***

"आमच्या 'वांगी' गावातील आरोग्य उपकेंद्र नियमित उघडत नसल्यामुळे कामगारांना आरोग्य सेवा मिळत नव्हत्या. आम्ही सरपंच, 'समुदाय आरोग्य अधिकारी' (सीएचओ) आणि तालुका आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधून, दोन दिवसांत उपकेंद्र सुरू करण्याची मागणी केली. आता आरोग्य उपकेंद्र नियमित उघडते, समितीच्या बैठकाही होतात आणि महिलांसाठी आरोग्य शिबिरेही आयोजित केली जात आहेत."

- **द्वारका ताई व सविता ताई,** जन आरोग्य समिती सदस्य, काठोडा, तालुका व जिल्हा- बीड.

***

"मी 'महिला ऊसतोड कामगार संघटने'ची गाव लीडर आहे. ऊसतोड कामगारांच्या आरोग्य समस्यांवर काम करते. 'जन आरोग्य समिती' सदस्य म्हणून स्वच्छता, ऊसतोड कामगारांसाठी गोळ्यांची मागणी आणि महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. यामुळे महिलांची आरोग्याबद्दल जागरूकता वाढली आहे."

- **राणी मोरे,** जन आरोग्य समिती सदस्य ता. वडवणी, जिल्हा- बीड

**सोसायटी फॉर प्रमोटिंग पार्टिसिपेटीव इकोसिस्टम मॅनेजमेंट (सोपेकॉम)**
gender.soppecom@gmail.com
www.soppecom.org
youtube.com/@soppecom
पल्लवी हर्षे - 8446425667
आरती बनकर - 7028483865

**महिला ऊसतोड कामगार संघटना**
mahilaustod@gmail.com
facebook.com/MahilaUstodKamgar
instagram.com/mahilaustodkamgarsanghtana
मनीषा तोकले - 9325056893
छाया पडघन - 9850074283